# प्रेसनोट दि. १८.११.२०२०

**श्री. नंदकूमार बाळकृष्ण पांडेजी सरकार मान्य रास्त धन्य दुकानदार रा. बुधगांव ता. मिरज जि. सांगली यांचेविरूध्द ७०००/- रुपये लाच मागणी केलेवरून गुन्हा दाखल सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.**

---

तक्रारदार यांचे रास्त धान्य दुकान असून तक्रारदार यांना शासनाकडून प्रलंबीत असलेले धान्य मंजूर करून देण्याकरता जिल्हा पुरवठा कार्यालय सांगली येथील अन्न धान्य वितरण अधिकारी सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे ५०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याबाबत तक्रारदार यांनी दि.०५.०५.२०२० रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली कार्यालयात तक्रारी अर्ज दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक ०५.०५.२०२० रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता तक्रारदार यांचे रेशन दुकासाठी शासनाकडून प्रलंबीत असलेले धान्य मंजूर करून देण्याकरता जिल्हा पुरवठा कार्यालय सांगली येथील अन्न धान्य वितरण अधिकारी सांगली यांना तसेच त्यांचे सोबत आले इतर अधिकारी यांना मिळून एकूण ७०००/- रूपये दे असे सांगून अन्न धान्य वितरण अधिकारी सांगली यांचे करिता तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे.

त्यानंतर सदर लाच मागणीस अन्न धान्य वितरण अधीकारी यांची संमती आहे अगर कसे या बाबात पडताळणी केली असता सदर पडताळणीमध्ये अन्न धान्य वितरण अधीकारी यांनी तक्रारदार यांचेकडे लाच मागणी केली नसल्याने श्री. नंदकूमार बाळकृष्ण पांडेजी सरकार मान्य रास्त धन्य दुकान रा. बुधगांव ता. मिरज जि. सांगली यांचे विरुध्द सांगली शहर पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, व श्री. सुहास नाडगोडा सो अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे, पोलीस उप अधीक्षक, श्री. गुरूदत्त मोरे पोलीस निरीक्षक, श्री. प्रशांत चौगुले पोलीस निरीक्षक तसेच पोलीस कर्मचारी, अविनाश सागर, संजय कलकुटगी, संजय संकपाळ, राधीका माने, चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अॅप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल अॅप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in